आपण विश्वास ठेवतो ती ती गोष्ट विश्वासार्ह असतेच, असे नाही
किती मध्यस्थ, त्यांचे स्थान, किती ग्रंथ, पुराने आणि त्यांचे भान
पूर्वज्ञान, पूर्वग्रह, त्यांचे भार, धर्मरुढी, परंपरांचे न मागितलेले दान
किती आधारभूत कंगारे विश्वासाला, पण हे विश्वासार्ह असतेच असे नाही.

तर्कशुद्ध विचार, व्यवहार नाकारण्याचे धैर्य, अनुभव अपरंपार
हितार्थ, उपयोगाचे तत्त्वज्ञान आणि माणुसकीचे गहिवर
निर्मितात विश्वास ठेवाव्यात अशा गोष्टी, असे दैनंदिन व्यवहार
आपण असे ठरवून घडत असू तर लोक विश्वास ठेवतात आपल्यावर.

२०.१.२०१९